स्थायी समिती

दाखल विषय – दि. ११/८/२०२०

विषय क्रमांक :– ३८६ त्वर्य

वारजे-कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद आयसोलेशन सेन्टर्समध्ये स्थापत्यविषयक दुरुस्ती कामे तसेच प्रतिबंध करण्यात येणा-या क्षेत्रामध्ये पत्रा मांडव करणे ,पत्रा पार्टीशन करणे व बांबूचे रेलिंग करणे आणि रेड झोन घोषित केलेला भाग सिल करणे कामी बांबूचे रेलिंग करणे ,पत्रा लावणे इत्यादी कामे करणे , मनपा मार्फत स्थापन करण्यात आलेल्या कोविड केअर सेंटर मध्ये गाद्या पुरविणे ही कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७)३) (क (नुसार मे.अनु कन्स्ट्रक्शन यांचेकडून मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये नमुद केलेल्या दरानुसार काम करुन घेणेस तसेच झालेल्या कामाचे दिनांक ०१/०५/२०२० पासून दि. ३१/७/२०२० पर्यंत र.रु. १८,३१,५५७=२४ पयतचे बील अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र. ३/२१७ दि.१०/८/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ३८७ त्वर्य

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे मैदान शिवाजीनगर येथे उभारण्यात येणा–या जंम्बो हॉस्पिटल/कोव्हीड हॉस्पिटलसाठी कमी अधिक प्रमाणात अंदाजे ५० कोटी रुपये तातडीने आगाऊ रक्कम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे यांना खालील अर्थशिर्षकामधून अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२३२ दि.११/८/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१
RE 17F 257
COVID- 19 अंतर्गत अत्त्यावश्यक महसूली कामासाठी खर्च.

विषय क्रमांक :– ३८८ त्वर्य

मा.महेंद्र पठारे, मा.दिपक पोटे, मा.सुनिल कांबळे, आमदार, मा.सौ.नंदा लोणकर, मा.सौ.सुनिता गलांडे, मा.श्रीमती लता राजगुरु, मा.अशोक कांबळे, मा.राजेंद्र शिळीमकर, मा.सौ.वर्षा तापकीर, मा.सौ.मानसी देशपांडे, मा.प्रकाश ढोरे, मा.सौ.उज्ज्वला जंगले, मा.श्रीमती अमृता बाबर व मा.कु.हिमाली कांबळे यांचे दि.११/८/२०२० चे पत्र.

पुणे शहरातील विकास कामांसाठी म.न.पा.च्या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेली आहे. कोविड–१९ च्या मुळे आर्थिक वर्ष सुरु झाल्यापासून विकास कामांची एस्टिमेट व टेंडर इ.प्रक्रिया मे.राज्य शासनाच्या आदेशानुसार होत नाही. त्यामुळे शहरातील विकास कामांना खीळ बसलेली आहे.

शहरातील विकास कामांची प्रक्रिया ही सुरु राहण्यासाठी मे.राज्य शासनास ही सभा पुणे शहरातील विकासकामांची प्रक्रिया सुरु करण्यासाठी विनंती करीत आहे.

तरी म.न.पा. प्रशासनाने मे.राज्य शासन व मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर विकास कामांची एस्टिमेट/टेंडर प्रक्रिया सुरु करण्यास मान्यता द्यावी.

विषय क्रमांक :– ३८९ त्वर्य

अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या आंबील ओढयामधील पदमजा पार्क ते के.के.मार्केट आणि कात्रज स्मशानभुमी दरम्यान मनपा मिळकतीच्या सिमाभिंती बांधणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.साई सिध्दी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,७७,९३,५०८=१० पेक्षा १८.५१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १,२९,४६,३६५=९० पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये १५,५३,५६३=९० असे एकूण र.रु. १,४४,९९,९२९=७५ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/२०८ दि.४/८/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३९० त्वर्य**

अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या आंबील ओढयामधील के.के.मार्केट ते पदमावती पुल व गजानन महाराज चौक ते वैकुंठ मुठा नदी दरम्यान मनपा मिळकतीच्या सिमाभिंती बांधणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सावी इन्फ्रास्ट्रक्चर्स अ‍ॅन्ड प्रापर्टीज प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७,२८,०२,५३९=१५ पेक्षा १५.०३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५,५२,३२,४२६=३५ व अधिक जी.एस.टी. र.रुपये ६६,२७,८९१=१६ एकूण र.रु. ६,१८,६०,३१७=५१ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/२०९ दि.४/८/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३९१ त्वर्य**

अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या आंबील ओढयामधील पेशवे तलाव ते पद्मजी पार्क व पदमावती पुल व गजानन महाराज चौक दरम्यान मनपा मिळकतीच्या सिमाभिंती बांधणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सावी इन्फ्रास्ट्रक्चर्स अ‍ॅन्ड प्रापर्टीज प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१०,५२,६५,३५२=९८ पेक्षा १५.०३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७,९८,६०,६८७=८८ व अधिक जी.एस.टी. र.रुपये ९५,८३,२८२=५४ एकूण र.रु. ८,९४,४३,९७०=४२ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/२१० दि.४/८/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३९२ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या सर्व दवाखाने, रूग्णालये व C.C.C.(Covid Care Centre ) कक्षांकरीता कोरोना कोव्हिड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरीता १व्हिटिएम किट.,२.Three Layer फेसमास्क्,३ ९५-एन. .४ मास्कPulse Oxymeter, ५इन्फ्रारेड . थर्मामिटर ६.Sterile Surgical Gloves ७.Hand Sanitizer, ८.Face Shield इत्यादी साधनसामुग्रींची खरेदी करणे कामी निविदा मागविल्या असता एकूण ३२ निविदा आलेल्या असून सदरची खरेदी कोव्हिड केअर सेंटरकडील मागणीनुसार व आवश्यकतेनुसार या निविदेतील पात्र तेवीस निविदाधारकांकडून रक्कम रूपये ६३,००,०००/- ( अक्षरी रक्कम रूपये तेसष्ट लाख फक्त ) पर्यंत खरेदी करणेस,त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस व खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२१५ दि.७/८/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१
RE 17F 257
COVID- 19 अंतर्गत अत्यावश्यक महसूली कामासाठी खर्च.

**विषय क्रमांक :– ३९३ त्वर्य**

कसबा–विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यकक्षेमध्ये झाडणकामाकरिता मजूर पुरविणे व त्यांच्याकडून काम करुन घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आदित्य सप्लायर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,२०,५५,४१४=८० पेक्षा ५.००% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,२६,५८,१८५=५४ नुसार उपलब्ध आर्थिक तरतुदीच्या मर्यादेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस तसेच सदरचे काम दि.१/६/२०२० पासून सुरु करण्यासाठी पश्चात मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.५/२१८ दि.१०/८/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३९४ त्वर्य**

ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत आरोग्य विभागामार्फत प्रभागातील सार्वजनिक स्वच्छता व पडीक हद्दीचे झाडणकाम करणे/साफसफाई करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार श्री एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४,१६,४५,९७८=४० पेक्षा ८.५०% जास्त दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४,५१,८५,८८६=५६ पर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस तसेच माहे १ जून २०२० पासून केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र. १/२२२ दि.१०/८/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३९५ त्वर्य**

आरोग्य खाते किटक प्रतीबंधक विभागासाठी डायफ्ल्यूबेन्झूरॉन २५% डब्लू.पी. डब्लू.पी. पुरविणे (बी–१ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.लक्ष्मी केमिकल्स लाइम ॲन्ड पेस्ट कंट्रोल, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९१,३५,७००/– पेक्षा २.५७% ने कमी) असल्याने त्यांचेकडून एकूण २००० किलो औषधाची र.रु. ८९,००,९१२=५१ पर्यंत खरेदी करण्यास त्यासाठी त्यांचेशी करारनामा करणेस त्यापोटी होणारे बिल सन २०२०–२१ (RE17F114) ५.जंतुनाशक विषारी औषधे ख.साथींचा बंदोबस्त या अर्थशिर्षकावर खर्ची टाकण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२२६ दि.११/८/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३९६ त्वर्य**

कोव्हिड १९ रुग्णांकरीता COVID - 19 Ag detection Kit खरेदी करणेसाठी दर कोटेशन मागविणे कामी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट व वर्तमानपत्रात जाहिर प्रकटन दिले असता आलेल्या २ निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक SD Biosensor Healthcare Private Limited यांचेकडून Standard Q COVID - 19 Ag detection Kit १,००,००० किट x रक्कम रूपये ४५९=२० पैसे जीएसटी करासहित रक्कम रूपये ४,५९,२०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये चार कोटी एकोणसाठ लाख वीस हजार फक्त ) पर्यंत खरेदी करणेस, खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२२७ दि.११/८/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१
RE 17F 257
COVID- 19 अंतर्गत अत्यावश्यक महसूली कामासाठी खर्च.

**विषय क्रमांक :– ३९७ त्वर्य**

COEP ( College of Engineering Pune ) येथे उभारण्यात येणा–या Jumbo Facility डेडीकेटेड कोव्हिड १९ हॉस्पिटल (डि.सी.एच.) करीता कोव्हिड १९ संबधित वैद्यकीय साधनसामुग्री व औषधे,प्रयोगशाळा तपासण्या,एक्स-रे,कपडे धुलाई,जैववैदयकीय कचरा व्यवस्थापन इत्यादी बाबींकरीता येणा-या खर्चास एकत्रित मान्यता मिळणेस,खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर रक्कम खर्ची टाकणेस, मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२२८ दि.११/८/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१
RE 17F 257
COVID- 19 अंतर्गत अत्त्यावश्यक महसूली कामासाठी खर्च.

**विषय क्रमांक :– ३९८ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या परिमंडळ क्र. २ च्या कार्यक्षेत्रातील विविध सांस्कृतिक भवनाची ऑपरेटिंगची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रत्नदीप जनरेटर्स ॲण्ड लाईट डेकोरेटर्स यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.५९,०१,४२९=५० ला २% जास्त दराने (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून दि.१७/७/२०१९ पासुन ते दि. २४/३/२०२० पर्यंत आणि पुढे कोरोना परिस्थितीचे निराकारण झालेनंतर जेव्हा पुन्हा सांस्कृतिक भवने सुरु होतील तेव्हापासून एकुण १२ महिने पुर्ण होईपर्यंत अथवा निविदा रक्कमेपर्यंत म्हणजेच पुर्वगणनपत्रक र.रु. ५९,०१,४२९=५० ला २% जास्त दराने (तडजोडीने) र.रु. ६०,१९,४५८=०९ पर्यंत यापैकी जे प्रथम घडेल त्यानुसार काम करुन घेणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी एकूण २६ कामगार संख्येनुसार बिल अदा करणे व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/२२९ दि.११/८/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३९९ त्वर्य**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ मधील कलम २(२) नुसार राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टीलायझर्स लिमिटेड यांचेकडून १५० टन अमोनियम बायकर्बोनेट करारनामा न करता खरेदी करणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/२३० दि.११/८/२०२० चे पत्र.

१) १५० मे.टन अमोनियम बायकार्बोनेट करारनामा न करता खरेदी करणेस
२) र.रु. ३३,४४,९४६/- (G.S.T. करासहित) रक्कम ही राष्ट्रीय केमिकल्स अॅन्ड फर्टीलायझर्स लिमिटेड यांना आर.टी.जी.एस.द्वारे अदा करणेस
३) सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ मधील कलम २(२) प्रमाणे काम करुन घेणेस
४) राष्ट्रीय केमिकल्स अॅन्ड फर्टीलायझर्स, चेंबुर यांचेकडून १५० मे.टन अमोनियम बायकार्बोनेटची वाहतुक पुणे महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभागामार्फत करणेस
५) १५० मे.टन अमोनियम बायकार्बोनेट खरेदी करणेसाठी खालील अर्थशिर्षकावरुन रक्कम अदा करणेस
सन २०२०-२०२१, RE19A159, गणपती उत्सवासाठी अमोनियम बायकार्बोनेट खरेदी करणे (मान्य तरतुद र.रुपये ७२,००,०००/-)

**विषय क्रमांक :- ४०० त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांकरिता डाटा एंट्री ऑपरेटर यांची सहा महिन्यांकरीता सेवा उपलब्ध करुन घेणे कामी निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा आल्या असून सर्वात कमी दर देणारे निविदाधारक M/s. Jay Shankar Associates यांचेकडून काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मा.तंत्र/२३१ दि.११/८/२०२० चे पत्र.

१) M/s. Jay Shankar Associates यांचेकडून ६० डाटा एंट्री ऑपरेटर घेणेस
२) ६० डाटा एंट्री ऑपरेटर पुरविणेकरीता M/s. Jay Shankar Associates यांना कार्यादेश देणेस व करारनामा करणेस
३) पुणे मनपासाठी ६० डाटा एंट्री ऑपरेटर ६ महिन्यांकरीता उपलब्ध करुन घेणेस व बिल अदा करणेस
४) पुणे मनपासाठी ६० डाटा एंट्री ऑपरेटर पुरविणेकामी M/s. Jay Shankar Associates यांना र.रु. ६६१=२६ प्रती ऑपरेटर प्रती दिन + कर अदा करणेस
५) M/s. Jay Shankar Associates यांना किमान वेतन कायदा नियम १९४८ नुसार सुधारित दराने बिल अदा करणेस
६) सदरचा खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस
RE11N103
सन २०२०-२१
विशेष प्रकारचे हिशेबी कामी कॉम्प्युटर करुन घेणे
ERP अंमलबजावणी, Software Development, GIS, Work Management System, Kiosk व तदनुषंगिक कामे करणे
७) तसेच मागील कामगारांचे थकीत वेतन अदा करणेस

**विषय क्रमांक :- ४०१ त्वर्य**

मा.दिपक पोटे यांचे दि.११/८/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या आर्कीटेक्ट पॅनेलवर श्री.सलील संजय सावरकर यांची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :- ४०२ त्वर्य**

मा.दिपक पोटे यांचे दि.११/८/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या आर्कीटेक्ट पॅनेलवर संदीप शिर्के अॅन्ड असोसिएट्स यांची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :- ४०३ त्वर्य**

मा.सौ.नंदा लोणकर व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि.११/८/२०२० चे पत्र.

वानवडी रामटेकडी क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत सर्व प्रभागातील पडिक हद्दीतील स्वच्छतेसाठी बिट्सनुसार झाडण काम करणे भाग २ (मनपा रजिस्ट्रेशन अट शिथील आहे) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.यु.आर.फॅसिलिटी सर्व्हिसेस यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.९९,९९,९५०=२४ पेक्षा ७.४७% जास्त) असल्याने त्यांचेकडून

र.रु.१,०७,४६,९४६=५२ तसेच खात्याकडील उपलब्ध तरतुद र.रु.९९,९९,९५०=२४ पर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी त्याप्रमाणे करार करणेस तसेच सदर काम हे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत काम करावयाचे असल्याने वरील संदर्भ क्र. १ नुसार मा.स्थायी समिती ठराव क्र. २४२५ दि.५/२/२०१९ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. तरी या कामाची मुदत तीन महिने असून त्याची मुदत पुढील एक वर्षापर्यंत दि.१/३/२०१९ ते ३१/३/२०२० पर्यंत वाढवून देण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– ४०४ त्वर्य**

मा.सौ.नंदा लोणकर व मा.प्रशांत जगताप यांचे दि.६/८/२०२० चे पत्र.

मौजे कोंढवा खु.स.नं.२९ या जागेवर सदर कोंढवा खु.उर्वरित गाव पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात येण्यापूर्वी (डिसेंबर १९९७ ) खाजगी स्वरूपाचा भूखंडाचा आराखडा मूळ जागा मालकांनी तयार करून सदर भूखंडाची विक्री केलेली आहे. मान्यता प्राप्त विकास आराखडयात सदर कोंढवा खु.२९ ही मिळकत रहिवासी विभागात समाविष्ट आहे. खाजगी भूखंडाचा आराखडयात प्लॉट नं.३१ ही मोकळी जागा या सदराखाली असून, त्यास जाण्या येण्यासाठी ९ मी.रूंदीच्या अंतर्गत रस्ता प्रस्तावित आहे. या दोन्ही मोकळ्या जागा व अंतर्गत रस्ता यांचा स्वतंत्रपणे ७ /१२ उतारे झालेले आहेत. खाजगी स्वरूपाचा भूखंड हा या जागेवर आता विकसित झाला आहे.

कोंढवा खु.उर्वरित भाग स.नं.२९ १९९७ साली पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेला आहे. मान्य विकास आराखडयात या भागात रहिवास विभाग असल्याने मोठ्या प्रमाणावर नागरी वसाहत झाली आहे. मोठया नागरी वसाहतीचा विचार करता या भागात नागरी सुविधाची वाणवा आहे. उपरोक्त स.नं.२९मधील मोकळी जागा उद्यान व खेळाचे मैदानासाठी विकसित झाल्यास नागरिकांच्या नागरी सुविधेत मोलाची भर पडणार आहे.

सबब कोंढवा खु.स.नं.२९ मधील सब प्लॉट क्र.३१ हा उद्यान व खेळाचे मैदान करण्यासाठी व प्लॉट ३० हा अंतर्गत रस्ता या कारणासाठी दोन्ही मिळकतींचे भूसंपादन करण्यात यावे व जमीन मालकास नियमानुसार देय असणारा मोबदला देण्यात यावा.

**विषय क्रमांक :– ४०५ त्वर्य**

मा.आबा बागुल यांचे दि.११/८/२०२० चे पत्र.

संपूर्ण भारतात २३ मार्च रोजी कोरोनाचा प्रदुर्भाव रोखण्यासाठी लॉक डाउन करण्यात आले होते. त्यास देशातील नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिल्यामुळे काही प्रमाणात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यास मदत होत आहे. देशाच्या अर्थ व्यवस्थेला चालना देण्यासाठी जुलै महिन्यापासून अनलॉक करण्यास सुरुवात करण्यात आली असून नागरिकांची वर्दळ रस्त्यावर वाढलेली दिसत आहे. त्यामुळे कोरोनाच्या रुग्ण संख्येत झपाट्याने वाढ होताना दिसत आहे. पुणे शहरात दिवसाला हजार रुग्ण सापडत असून आज रोजी पुण्यात १००२६४ पेक्षा जास्त रुग्ण कोरोना पॉझिटीव्ह असल्याबाबत प्रशासनाकडून माहिती मिळत आहे.

पुणे शहरात कोरोना रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता शहराची आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्याची अत्यंत गरज आहे. शहरात नागरिकांना उपचार देण्यासाठी सार्वजनिक हॉस्पिटल मोठ्या प्रमाणात नसून, पुणे महानगरपालिका देत असलेल्या दराने खासगी हॉस्पिटल कोरोना रुग्णांवर उपचार करण्यास तयार नाही. तसेच रोजगार गेल्यामुळे आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना कोरोनावरील उपचार घेण्यास मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

पुणे शहरातील आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना उत्तम आरोग्यसेवा देण्यासाठी सरकारी कंपनीकडून सर्वात कमी प्रीमियममध्ये कोरोना कवच विमा हा आरोग्य विमा काढल्यास कोरोना झालेल्या व्यक्तीस भारतामध्ये कोणत्याही खासगी हॉस्पिटलमध्ये कॅशलेस सुविधा मिळून त्यांच्यावर तातडीने उपचार केले जातील. यामाध्यमातून कोरोना रुग्णांवर त्वरित उपचार होतील.कोणत्याही नागरिकाचा उपचाराविना जीव जाणार नाही. आतापर्यंत कोरोनावरील उपचारावर केलेले खर्च पाहता विमा काढणे आवश्यक आहे. यासाठी पुणे महानगरपालिकेने इतर सुविधांवर जास्त खर्च न करता आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांचा कोरोना कवच आरोग्य विमा काढावा जेणे करून कोरोना झाल्यावर उपचार घेण्यास त्यांना आर्थिक अडचणी येणार नाहीत. त्यामुळे कोणाचाही उपचाराविना नाहक मृत्यू होणार नाही.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**